**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**सोमवार दिनांक ०१ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात; केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, तसंच आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक लोकसभेत सादर.**
2. **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही निवडणुका पुढे ढकलण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला राजकीय पक्षांचा विरोध.**
3. **अमरावती महानगरपालिकेने 'तांबट' पक्ष्याची अमरावती शहराचा अधिकृत पक्षी म्हणून केली निवड.**
4. **१०.८ अंश सेल्सिअस तापमानासह यवतमाळ जिल्हा विदर्भात सर्वाधिक थंड.**

**आता सविस्तर बातम्या .......**

संसद अधिवेशन

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. लोकसभेत आज कामकाज सुरू झालं तेव्हा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, निवृत्त कर्नल सोना राम चौधरी, प्राध्यापक विजय कुमार मल्होत्रा आणि रवी नाईक यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. यावर बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली आणि कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन केलं. बिर्ला यांच्या आवाहनानंतरही घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे सभापतींनी दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झालं तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ सादर सभागृहात सादर केली. त्यानंतर विरोधी पक्षांची घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत आज ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे गुरविंदर सिंग ओबेरॉय, चौधरी मोहम्मद रमजान आणि सज्जाद अहमद किचलू यांनी वरिष्ठ सभागृहात सदस्य म्हणून शपथ घेतली. पहिल्यांदाच राज्यसभेचे अध्यक्षपद भूषवणारे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन

यांचं स्वागत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो असं मोदी यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना भारतीय लोकशाहीविषयी मोदी म्हणाले....

***गत दिनों बिहार में जो चुनाव हुए उसमें भी मतदान के जो विक्रम हुआ है वो लोकतंत्र की सबसे बड़ी ताकत है। माताओं बहनों की जो भागीदारी बढ़ रही है, यह अपने आप में एक नई आशा, नया विश्वास पैदा करती है। एक तरफ लोकतंत्र की मजबूती और इस लोकतांत्रिक व्यवस्थाओं के भीतर अर्थतंत्र की मजबूती इसको भी दुनिया बहुत बारीकी से देख रही है। भारत ने सिद्ध कर दिया है डेमोक्रेसी कैन डेलिवर।***

त्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे राज्यसभेचं कामकाजही दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

एअर मार्शल यल्ला उमेश

एअर मार्शल यल्ला उमेश यांनी आज 39 वे एअर कमांडिंग इन चीफ म्हणून भारतीय हवाई दलाच्या देखभाल कमांडची सूत्रे स्वीकारली. एअरॉनॉटीकल अभियांत्रिकी शाखेत रुजू झाल्यापासून भारतीय हवाई दलाने केलेल्या अनेक मोठ्या लढाया, वाहतूक आणि विशेष ताफ्यांमध्ये त्यांनी विविध अभियांत्रिकी तसेच नेतृत्वविषयक भूमिका त्यांनी समर्थपणे निभावल्या आहेत. कॅट ए' एअरॉनॉटीकल अभियंता असलेल्या यल्ला यांनी व्यवस्थापन विषयात डॉक्टरेट, औद्योगिक अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन विषयात पदव्युत्तर पदवी आणि यांत्रिक अभियांत्रिकी विषयात पदवी मिळवलेली आहे. संरक्षण व्यवस्थापन महाविद्यालय आणि राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयाचे ते माजी विद्यार्थी आहेत.

प्रसारण सचिव संजय जाजू

देशातल्या मनोरंजन आणि माध्यम जगात खूप क्षमता आहे. त्यांचा सुयोग्य वापर होण्याची गरज केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी आज व्यक्त केली. मुंबईत सीआयआय बिग पिक्चर समिटमध्ये ते बोलत होते. जागतिक बाजारपेठेत भारताची हिस्सेदारी केवळ २ टक्के आहे. यासंधीचा लाभ घेण्याचं आवाहन त्यांनी उद्योगाला केलं. देशातल्या मनोरंजन उद्योगावर १ कोटीहून अधिक लोकं अवलंबून आहेत. AI आधारित गाणी आणि व्हिडीओ या क्षेत्रातली गणितं बदलत असताना आपणही नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीं निवडणुक

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठीच्या निवडणुकीसाठी प्रचार करण्याचा आज शेवटचा दिवस असल्यानं प्रचार शिगेला पोहोचला आहे. विविध पक्षांचे नेते मतदारांचा कौल मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. आज रात्री १० वाजता हा प्रचार संपेल. दरम्यान, राज्यातल्या काही मतदारसंघांमधल्या निवडणुकांबाबत काही जणांनी न्यायालयात धाव घेतल्यानं इथल्या निवडणुका पुढं ढकलायचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. हा निर्णय चुकीचा आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. हा निर्णय इतर उमेदवारांवर अन्याय करणारा असून तो कायद्याला धरून नाही, असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हा निर्णय चुकीचा असल्याचं मत व्यक्त केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही या निर्णयावर टीका केली. मतदान एका दिवसावर आलेलं असताना २० नगरपालिका आणि काही प्रभागांमधल्या निवडणुका पुढं ढकलायचा निर्णय आश्चर्यकारक आणि अनाकलनीय असून आयोगाचा भोंगळ कारभार सुरू आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला. नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या उद्या होणाऱ्या मतदानासाठी  यंत्रणा सज्ज आहे. नंदुरबार जिल्ह्यातल्या चार नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी आज निवडणूक पथकं आपापल्या मतदान केंद्रांवर रवाना होत आहेत. दरम्यान, सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वर आणि फलटण पालिकेची निवडणूक, तसंच मलकापूर पालिकेतल्या २ ठिकाणी न्यायालयाच्या निर्णयानुसार २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर अकोला जिल्ह्यातल्या अकोट तालुक्यातल्या प्रभाग ४ ची निवडणूक उमेदवाराचा मृत्यू झाल्यानं स्थगित करण्यात आली आहे.

अधिकृत पक्षी

पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत अमरावती महानगरपालिकेने ‘तांबट’ (Coppersmith Barbet) याची अमरावती शहराचा अधिकृत पक्षी म्हणून निवड केली. माझी वसुंधरा अभियान 6.0 अंतर्गत झालेल्या या उपक्रमाची घोषणा आयुक्त सौम्या शर्मा चंदक यांच्या हस्ते हॅपी स्ट्रीट कार्यक्रमात करण्यात आली. नागरिकांच्या मतदानातून पारदर्शक पद्धतीने निवड झालेल्या या प्रक्रियेत 5,445 मते नोंदली गेली असून तांबट पक्ष्याने 1,414 मते मिळवत आघाडी घेतली. या निवडीमुळे अमरावती महाराष्ट्रातील पहिले असे शहर ठरले आहे ज्याने अधिकृत शहर पक्षी घोषित करून पर्यावरण जपणुकीचा आदर्श ठेवला आहे.

सुजात आंबेडकर

निवडणूक आयोग आणि भाजप संगनमताने सामान्य माणूस स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणारच नाही अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करत आहे असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी आज नागपूरच्या प्रेस क्लब येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला .धनशक्तीचा वापर करून सत्तेत असणारे लोकांना पैशांचे आमिष दाखवून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये वंचितांना आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या उमेदवारांना लढूच न देण्याची भूमिका घेत आहेत असे देखील त्यांनी सांगितलं. वंचित बहुजन आघाडीने काँग्रेस सोबत युतीसाठी नांदेडच्या निवडणुकीत हात पुढे केला होता परंतु काँग्रेसने आम्हाला धोका दिला असे सांगून त्यांनी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीची शक्यता केवळ सन्मानपूर्वक वागणूक आणि पन्नास टक्के जागांचं वाटप या सूत्रावरच होऊ शकतं असं स्पष्ट केलं.

चंद्रशेखर बावनकुळे

स्थानिक स्वराज्य निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसमध्ये मोठे अंतर निर्माण झाले असून पक्षातील नेत्यांमध्ये विसंवाद वाढला आहे. अनेक पदाधिकारी व नगरसेवक भाजपच्या संपर्कात असल्याचा दावा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

हवामान

विदर्भात सर्वाधिक कमी किमान तापमानाची नोंद यवतमाळ इथं १०.८ अंश सेल्सिअस इतकी करण्यात आली. यवतमाळ पाठोपाठ वाशिम इथं 11 अंश सेल्सिअस तर नागपूर आणि भंडारा इथं बारा अंश सेल्सिअस तर इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 12 ते 14 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी काही दिवस हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

दोन दिवसीय कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लोक प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य शासन विभागाच्या वतीने 'संशोधन पद्धती' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

करण्यात आले. संशोधक, विद्यार्थी आणि शिक्षकांना आधुनिक संशोधन तंत्रांची सखोल समज मिळावी हा या कार्यशाळेचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

भव्य बाईक रॅली

श्री गुरु तेग बहादूर सिंग साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्त राज्यस्तरीय समितीच्या वतीने भव्य बाईक रॅलीचे नागपुरात आयोजन करण्यात आले. बाबा बुधाजी नगर येथून सुरुवात झालेल्या या रॅलीत शेकडो भाविकांनी सहभागी होत मानवता, धार्मिक स्वातंत्र्य आणि एकतेचा संदेश दिला.

*****